# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## (शिक्षण विभाग)

जा.क्र.४७३०/शि.वि./२०१५ दि.१७/०८/२०१५

**तात्काळ**

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्राथ/उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

विषय :- सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज मोफत भरून देण्याची सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याबाबत.

संदर्भ – मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कार्यालयातर्फे प्राप्त झालेल्या सुचनेनुसार.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, म.न.पा.तील मागासवर्गीय व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक वर्षातील आर्थिक अडचणी दूर होण्याचे दृष्टिने लवकरात लवकर शिष्यवृत्ती मिळावी, याकरीता आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व विद्यार्थ्यांची शाळेतील शैक्षणिक सत्र २०१५-१६ मधील सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज दि.२५ ऑगस्ट, २०१५ पर्यंत भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

करीता मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या सुचनेप्रमाणे समाज कल्याण विभागामार्फत सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन अर्ज मोफत भरण्याची सुविधा स्थळ – प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या बाजुला, टि-पॉईंट, सिताबर्डी, नागपूर येथे या महिनाअखेर पर्यंत केंद्र सुरू ठेवण्यात आलेले आहे. करीता आपण आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसंबंधी माहिती घेवून संबंधी स्थळी उपस्थित राहून ऑनलाईन अर्ज भरून घ्यावेत.

सदर बाबींची तात्काळ दखल घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

प्रतिलिपी,

१. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. आयुक्त, म.न.पा., नागपूर.
४. मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
५. मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
६. सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र.१ ते १०, म.न.पा., नागपूर